# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १४८/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आण्णाप्पा गिरमल्ला माळी,<br>मु.पो. रामपूर, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडल कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. आण्णाप्पा गिरमल्ला माळी, मु.पो. रामपूर, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग विरुध्द तक्रार दि. ८.१२.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार यांनी आपली शेत जमीनीमध्ये ६ अश्वशक्ती शेतीपंपास दि. १४.४.२००० रोजी वीज पुरवठा घेतलेला आहे, यासाठी वितरण वाहिनीची आवश्यकता होती, परंतु वि.प.ने हा वीज पुरवठा केबलवर दिलेला आहे. यासाठी पोलही उभे केलेले आहेत, परंतु आजतागायत वारंवार मागणी करुनही योग्य पध्दतीने वीजपुरवठा केला नाही. ग्राहकास वि.प.ने केबल दिलेली आहे परंतु नादुरुस्त झाल्यानंतर स्वखर्चाने बदलण्यास सांगितले जाते असे म्हटले आहे. त्यामुळे ग्राहकाने आपल्या तक्रार अर्जात कायदेशीर तरतुदी विचारांत घेऊन सुव्यवस्थित वाहिनीचा विस्तार करुन द्यावा अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने नोटीस देऊनही मुदतीत दि. २८.१२.२०११ पर्यंत आपला लेखी अहवाल दिला नाही. वि.प.ने आपल्या दि. ६.१.२०१२ च्या लेखी अहवालात तक्रारदार ग्राहकाने नवीन शेतीपंप कनेक्शन दि. १४.४.२००० रोजी घेतल्याचे मान्य केले आहे. सदरची वीज जोडणी केबलवर दिलेली आहे. वितरण कंपनी विविध कायद्यांचे पालन करुन त्यांना लवकरांत लवकर पोल उभे करुन विद्युत तारा ओढून नियमाप्रमाणे वीज कनेक्शन देण्यात येईल असे नमूद करुन ग्राहकाने मागितलेली नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. ११.१.२०१२ रोजी मंचासमोर सुनावणीस घेण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, कनिष्ठ अभियंता श्री. अे.के. कुलकर्णी, एस.वाय.पाटील उपस्थित. श्री. खापरे यांनी मंचासमोर वि.प.ने दिलेला विद्युत पुरवठा अधिनियमातील तरतुदीनुसार सुरक्षित नाही, त्यामुळे सुरक्षित व सुव्यवस्थित वाहिनीचा विस्तार करुन विद्युत पुरवठा द्यावा अशी मागणी केली. वि.प.चे अधिकारी श्री. एस.वाय.पाटील यांनी १ पोलचे काम पूर्ण करुन ८ दिवसांत विद्युत पुरवठा सुरक्षित करुन देतो व त्याचा पूर्तता अहवाल दि. २३.१.२०१२ पर्यंत देतो असे सांगितले. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी ग्राहकास विद्युत कायदा २००३ मधील अधिनियमानुसार दि. २३.१.२०१२ पूर्वी सुरक्षित विद्युत पुरवठा करावा व तसा अहवाल मंचास द्यावा.

३) ग्राहकाने पूर्तता झाल्याचा अहवाल किंवा कांही कमतरता असल्यास मंचास कळवावे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com